Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P024

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Nov'25
Issue–XI(I), Volume–XIII

# संत तुकारामांच्या व्यक्तित्वातील काव्यदर्शन

डॉ. बळीराम राऊत
प्राध्यापक (मराठी विभाग)
जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय उमरेड
जि.नागपूर – Pin No: 4412103
Mob : 9767278720/9356229389
Email : baliramraut37@gmail.com

**सारांश**

संत तुकाराम महाराज महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील युगपुरूष होते. शुद्रातील शुद्र समाजाचे जननायक होते. त्यांनी समाजातील तळागळातील हलाखिचे जीवन व्यतीत करीत असलेल्या लोकांना आपल्या काव्यशक्तीने कीर्तनाच्या माध्यमातून लोकजागृतीचे महान कार्य केले. भूतदया, मानवतावादी दृष्टीकोण, करूणा लोकांना शिकविली.

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा।।

यातून सेवा, प्रेमभाव, साधू–संताचा आदर ह्यातच परमात्माचा निवास हे साध्याशब्दातून तत्वज्ञानाची शिकवण दिली. तुकाराम महराज महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक, परिवर्तनाचे बीज आहेत. तत्कालीन समाजात दांभिकांचा वाढलेल्या स्वैराचावर प्रहार करून डोळस दृष्टी सर्वसामान्यांना दाखविली. ज्ञानेश्वरांनी घालून दिलेल्या भागवत धर्माची परिवर्तननात्मक परंपरा जनसामान्यात बळकट करून डोळस भक्तीमार्ग सांगीतला. तुकारामाच्या भाषा साधी–सुलभ सर्वसामान्यांच्या परिचयाची त्यामुळे तुकाराम लोकांना आपलेसे वाटतात. त्यांच्या काव्याची भाषा समजणारी असल्यामुळे खेड्यापाळ्यातील जनतेला त्यांचे अभंग, काव्य मुखोदगत होते. तुकाराम महाराज साक्षातकारी संत नसून कार्यकर्तृत्वान पुरूष होते. त्याचे शब्द व्रजाहून कठीण तर प्रसंगी लोण्याहून मऊ. तुकारामांनी वाईट प्रथावर प्रहार चढवून अंधश्रद्धेच्या गर्गेतून समाजाला वर काढण्याचे महान कार्य केले. ते संतच नाही तर खरेखुरे समाजसुधारकही होते.

**मुख्यशब्द** :– युगपुरूष तुकाराम, भूतदया, मानवता, करूणा, महाराष्ट्राची सांस्कृतीक अस्मिता, दांभिकांचा स्फोट, अंधश्रद्धा, समाजसुधारणा, प्रभावी काव्य, सामाजिक तत्वज्ञान.

संत तुकाराम महाराज युगपुरूष होते. १७वे शतक म्हणजे तुकाबाच्या प्रखर वाणीने दुमदुमले होते. समाजातील शुद्रातिशुद्रांचा हा जननायक आपल्या विद्रोहात्मक वाक् युद्धातून परिवर्तनात्मक संवदेना बोलत होता. दीनदलितांच्या सामाजिक आणि आत्मिक उन्नयनासाठी जीवाचे रान उठवित वा करीत होता. जगाचे हित व कल्याण त्यांच्या उद्धार त्यांच्या अंभगवाणीतून रसरसून बाहेर पडत होता. भूतदया, करूणा आणि मानवता त्यांच्या अंतकरणातून ओसंडत होता.

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा।।

अशी भूतदयावादी माणसाची व्याख्या केली.

जगाच्या कल्याणा संताच्या विभूति।
देह कष्टविती उपकारे।।

दया तिचे नाव भूताचे पालन।
आणि निर्दलन कंटकाचे।।
तुका म्हणे आता।
उरलो उपकारापुरता।।

हे तुकारामाचे आत्मोद्‌गार आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने तुकारामाचे स्थान फार मोठे आहे. तुकारामाच्या जीवनात अनेक धर्मातरे होत हाती व झाली. अंधश्रद्धेचे वारे वाहू लागले. धर्माधितेच्या लाटा उसळल्या, धर्म लयाला जाऊ लागला. मुसलमान आले, ख्रिश्चन आले. अनेक युद्धे झाली. स्वराज्य आले–गेले. बऱ्याच गोष्टी काळाच्या प्रवाहात वाहून गेल्या. स्मुती–लोपल्या. पण तुकारामाच्या अस्तित्वाने नवा पुरोगामी विचार समाजात किर्तनाच्या माध्यमातुन पुढे आली. काळानुरूप अनेक स्थित्यंतरे झाली परंतु तुकाराम बदलले नाहीत आपल्या विचारावर ठाम राहिले. सडेतोड भाषा, दांभिकावर प्रहार, बंडखोरी, अंधश्रद्धेची चिरफाड, रोखठोक विचार हे तुकारामाच्या व्यक्तिमत्वाचे गुण! त्या आपल्या विद्रोहात्मक रोखठोक भाषेने महाराष्ट्राच्या मातीत सात्वीक विचाराचे बीज रोवले. रूजलेल्या व वाढलेल्या वृक्षाला विचाररूपी रसाळ फळे बहरली.

तरूवर बीजापोटी। बीज तरूवर शेवटी।।
तैसे तुम्हा आम्हा आले। एकी एक सामावले।।

त्यासाठी तुकारामांना अनेक वेळा कठोर भूमिकाही घ्यावी लागली.

रात्रदिन आम्हा युद्धाच्या प्रसंग।
अंतबाह्य जग आणि मन।।

सहजतेने समाजसी मुकाबला करीत राहीले।

मऊ मोठाहून आम्ही विष्णूदास।
कठीण वज्रास भेदू ऐसा।।

हे तुकाराम महाराज कळवळनू बोलत होते. धर्मामार्तडांच्या अरेरावी मोडून काढण्यासाठी स्पष्टपणे

वेदांचा तो अर्थ आम्हासी ठावा।
येरांनी वाहावा भार माथा।।

हे ठणकाहून सांगत तुकारामांनी आपल्या काव्य विचारातून सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून दिला.

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा प्रभाव वाढत होता. अनेक संत आपल्या वाणीतून सर्वसामान्य जनतेला सर्वोतोपरी प्रबोधन करीत होते. भक्तीमार्ग बळकट करीत होते. त्यांचे सोदर्य व त्यामधील तत्वज्ञान साध्या सोप्या भाषेतून सांगत होते. तुकारामही ज्ञानेश्वरापासून ते एकनाथा पर्यंतच्या संतपरंपरेतील संतांच्या विचारांचा परामर्श घेतला. त्यातील भावकाव्य तुकारामानीही आपल्या परखड व ओजस्वी वाणीतून समाजापुढे मांडल्या. तुकारामापुढे जो समाज होता तो शुद्र–अज्ञ असाच होता. ह्या समाजाला पुढे ठेवून तुकारामांचे साध्या सुलभ भाषेतील काव्य तळागाळातील लोकांना समजू लागले. त्यांच्या काव्याची साधी सुलभ–भाषा अज्ञ लोकांच्या मुखी घोकू लागली हेच तुकारामाच्या काव्याची विलक्षण ताकद होती.

तुकारामाच्या काव्याचे प्रमुख ध्येय लोककल्याण हेच होते. लोकजीवनातील शाश्वत मुल्ये त्यांच्या काव्यात आपसुकच येणे स्वाभाविक आहे. लोकांच्या जीवनात आजुबाजुला दैनंदिन जीवनात ज्या घडामोडी घडतात सभोवती जे सृष्टीचे स्वरूप वास्तव्य करते, मानव आणि निसर्गाचा जो वाद–संवाद सातत्याने अविरत सुरू असतो तेच तुकाराम लोकांना सहज समजेल, रूचेल व पचेल.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2511S01V13P024

तेच आपल्या रसाळ काव्यातून कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या गळी उतरविण्यात यशस्वी ठरतात म्हणून ते समाजजीवनातील सर्वसामान्याचे युगनायक ठरतात. त्याची भाषाही साधी—सोपी लोकभाषा आहे. त्यात पांडित्याचा आव अथवा कुठेही अभिमानाचा भाव नाही. सहज स्वाभाविकपणा त्यांच्या लोकभाषेत आहोत. समाजाचे दु:ख, दैन्य, दारिद्र्य, पराधिनता, धार्मिक गुलामगिरी, अंधश्रद्धा आदी असामाजिक आणि जीवनाला सतत दु:खात ठेवणारी दुर्दशापाहून तुकोबा खिन्न झाले.

"न देखवे डोळा ऐसा हा आकांत,परपीडा चित्त दु:खी होते" या दु:खमय कष्टातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी भक्तीमार्ग दाखवला. लोकजीवनातील सत्ये लोकांसमोर मांडण्यासाठी लोकमाध्य माध्यमांचा स्वीकार करा. वारकऱ्यांची अविष्कार माध्यमे कीर्तन, पुराण, प्रवचन, पारायण, पाठ, गोंधळ, रूपक,भंदिक, जागरण, ळळीत, आरत्या, सप्ताहकाला, पालखी, दिंडी, वारी ह्या मौखिक देशीय संतकवी प्रबोधनाचा व भक्तीचा विचार तुकोबा लोकांपर्यंत पोहचवत होते.

तुकोबांनी मात्र अभंग आणि कीर्तनाच्या माध्यमातून लोकभाषा माध्यम स्विकारले आणि भोवती घडणाऱ्या घटनांचे दृष्टांत देऊन तुकोबा आपल्या काव्यमय ओजस्वी वाणीतुन विचार सर्वसामान्यापर्यंत पोहवत असत. हेच विचार लोकांच्या प्रभावीपणे गळी उतरत असत. तुकोबाच्या काव्याची भाषा सोपी—साधी असल्याने अडाण्यातल्या अडाणी माणसाच्या सहज लक्षात व मुखोद्गत होत असत. इतका प्रभाव त्याच्या काव्यरचनेत होते. म्हणुनच तुकोबा हे सर्वसामान्याचे संत झाले. जनसामान्यांची याच गुणांची तुकरामांना आपल्या डोक्यावर व डोक्यात स्थान दिले. त्याची दृष्टांताची भाषा चटकण कळते व हृदयाचा ठाव घेते.

"महापुरे झाडे जाती। तेथे लव्हाळे वाचती।।"
शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी।।
जया अंगी मोठेपण। तथायातना कठीण।।
चणे खावे लोखंडाचे। तेव्हा ब्रम्हपदी नाचे।।

तुकोबाच्या काव्यातील उपमा आणि प्रतिमा हे लोक जीवनाचे प्रतिबिंब दर्शवितात. तुकारामाचे काव्याचे वैशिष्ट्ये अर्थप्रवाही शिवाय सुभाषित वजा काव्य बनले.

"जन हे दिल्या घेतल्याचे। अंत हे काळीचे कोणी नाही"
"सुख पहता जीवापाडे। दु:ख पर्वता ऐवढे।।"

हे तत्वज्ञान सहज तुकोबाच्या काव्यातून प्रगटते म्हाणून तुकोबा सर्वाचे जवळचे वाटतात ते केवळ त्यांच्या 'लोण्याहूनि मऊ' भाषेणे त्यांच्या भाषेत कमालिची मृदुता आणि तेज आहे. प्रसंगी अनिष्ठ तत्वांना जाळून टाकण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या काव्यवाणीत आहे.

संदर्भ:—

१) डॉ. शिरवाडकर — तुकारामाची भाषाशैली.
२) डॉ. काळे वि.दा — संत तुकाराम आणि वारकरी पंथ.
३) डॉ. बधोळे वि.वा — तुकाराम: धर्म आणि समाज.
४) डॉ. सानप किशोर — ।। तुकाराम।।
५) प्रा. तायडे मनोज — व्यक्त्वि आणि कवित्व.